Estd. 1962
"A++"
Accredited by NAAC (2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004,**
**MAHARASHTRA**
**CENTRE FOR DISTANCE AND ONLINE EDUCATION**
**PHONE : – 0231-2609105,2609451,2609452**
www.unishivaji.ac.in, e-mail - cde@unishivaji.ac.in

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर- ४१६००४, महाराष्ट्र
सेंटर फॉर डिस्टन्स अ‍ॅण्ड ऑनलाईन एज्युकेशन
दूरध्वनी क्र. ०२३१-२६०९१०५,२६०९४५१,२६०९४५२
www.unishivaji.ac.in, e-mail - cde@unishivaji.ac.in


जा.क्र.शिवाजी विद्यापीठ/सी.डी.ओ.ई./ पी.पी.जे/358 दिनांक.- 11 JUL 2023

प्रति,
मा.प्राचार्य (केंद्रप्रमुख),
दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण सर्व अभ्यासकेंद्रे,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय: शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ विद्यार्थी प्रवेशप्रक्रिया कार्यशाळेबाबत.

महोदय/महोदया,

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्यावतीने शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ साठी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेशप्रक्रिया जून, २०२३ पासून मुख्यालय व कोल्हापूर, सांगली, व सातारा जिल्हयातील विविध अभ्यासकेंद्रामार्फत सुरू झालेली आहे. त्या अनुषंगाने दि.३०/०६/२०२३ रोजी ऑनलाईन पध्दतीने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर प्रवेशप्रक्रिये संदर्भात सविस्तर मार्गदर्शन करण्याच्यादृष्टीने चालू शैक्षणिक वर्षामध्ये आपल्या अभ्यासकेंद्रावर कार्यरत असणारे समन्वयक व संबंधित लेखनिक यांची **कार्यशाळा शनिवार दि.१५ जूलै, २०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर कार्यशाळेस विद्यापीठाचे दूरशिक्षण केंद्राचे वरिष्ठ अधिकारी त्याचबरोबर विद्यापीठातील संगणक केंद्राचे व लेखा विभागाचे अधिकारी खालील बाबींवर मार्गदर्शन करणार आहेत.

1. Online Admission cum examination form process.
2. Electronically Inwarding of application cum examination form.
3. How to Generate ABC ID Number.
4. Duel Degree Online Application.
5. Online Payment Gateway.
6. Generation of various reports & submission.
7. Any other item.

तसेच प्रवेशप्रक्रीया सुलभ होण्याच्या दृष्टीने आपल्या सुचना, अडचणी तात्काळ cde@unishivaji.ac.in या ई-मेल वर पाठवून द्याव्यात जेणेकरून कार्यशाळेमध्ये आपणास मार्गदर्शन करता येईल. सदर कार्यशाळेसाठी आपल्या अभ्यासकेंद्राचे समन्वयक व लेखनिक यांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,
(Shirole)
सहाय्यक कुलसचिव

प्रत – १. सर्वसाधारण बांधकाम व देयके विभाग
२. परीक्षा विभाग
३. संगणक केंद्र
४. दूरशिक्षण प्रवेश विभाग
५. मा.उपकुलसचिव, वित्त व लेखा विभाग यांना माहितीसाठी व अनुषंगीक कार्यवाहीसाठी

<u>महत्वाची टिप</u> : उपस्थित सदस्यांनी आपल्या बॅंकेचे नांव, खाते नंबर व IFSC Code इ. बाबी प्रवास भत्ते देयकामध्ये बिनचूक नमूद करणे आवश्यक आहे.

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

### बी.ए. भाग २, एम.ए, भाग १ व २ हिंदी विषयाच्या दि.१०/०८/२०२३ रोजीच्या

### कार्यशाळेचा इतिवृत्तांत

शैक्षणिक वर्ष २०२३ – २०२४ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अन्वये सुधारित करण्यात आलेल्या बी.ए. भाग २, एम.ए, भाग १ व २ हिंदी विषयाच्या अभ्यासक्रमाप्रमाणे सदर विषयाचे स्वयं अध्ययन साहित्य तयार करणेसाठी दि. १०/०८/२०२३ रोजी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र येथे सदर विषयाच्या लेखकांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेस मानवविज्ञान विद्याशाखचे अधिष्ठाता प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख, हिंदी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रो. (डॉ.) एस. एस. सावंत, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. (डॉ.) डी. के. मोरे, समन्वयक डॉ के. बी. पाटील, सहाय्यक प्राध्यापक डॉ एन. एस. रणदिवे, डॉ पी. एस. कांबळे व हिंदी विषयाचे लेखक उपस्थित होते.

कार्यशाळेच्या सुरुवातीला दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रांचे समन्वयक डॉ के. बी. पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत करुन कार्यशाळेचे आयोजनाबाबत माहिती दिली यानंतर मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख यांनी उपस्थितांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० बाबत सविस्तर माहिती देवून त्यानुसार तयार करण्यात आलेले अभ्यासक्रम रचनेबाबत मार्गदर्शन केले व सर्व लेखकांनी आपले घटक लेखन दर्जेदार व वेळेत सादर करावे अशी सूचना केली

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. (डॉ.) डी. के. मोरे यांनी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडे प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्याकरिता स्वयंअध्ययन साहित्याचे महत्व विशद केले तसेच ते वेळेत विद्यार्थ्यांना न उपलब्ध झालेस त्यामुळे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रास येणाऱ्या अडचणी विशद केल्या. चालू शैक्षणिक वर्षातील हिवाळी सत्रातील परीक्षा माहे ऑक्टोबरमध्ये नियोजित आहे त्यापुर्वी प्रवेशित विद्यार्थ्यांकडून स्वाध्याय व इतर बाबीची पुर्तता करुन घ्यावी लागणार आहे त्यामुळे वरील बदलेल्या अभ्यासक्रमाचे स्वयंअध्ययन साहित्य तातडीने तयार करणे गरजेचे आहे. त्याकरिता सर्व लेखकांनी आपले घटक लेखन निर्धारीत वेळेत या केंद्रास सादर करावे अशी विनंती केली. तसेच उपस्थित लेखकांना कॉपी राईट व लेखन करीत असतांना घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले.

यानंतर हिंदी अभ्यासमंडळाचे अध्यक्ष यांनी प्रा (डॉ.) एस. एस. सावंत यांनी उपस्थितांना शैक्षणिक वर्ष २०२३ – २०२४ मध्ये सुधारित झालेले हिंदी विषयाचे बी.ए. भाग २, एम.ए, भाग १ व २ या पाठयक्रमांच्या अभ्यासक्रमाचे स्वरुप व त्यानुसार अपेक्षित घटक लेखन याबाबत उपस्थित लेखकांना मार्गदर्शन केले.

तद्नंतर अधिसभा सदस्य डॉ सुनिल बनसोडे यांनी घटक लेखनाचे स्वरुप, संदर्भ साहित्य, घटक लेखनाची भाषाशैली याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यानंतर बी.ए. भाग २, एम. ए, भाग १ व २ हिंदी विषयाच्या खालील पेपरचे स्वयं अध्ययन साहित्य तयार करण्याचे निश्चित करुन त्याच्या लेखन व संपादनासाठी लेखक व संपादक नियुक्त करण्यात आले कार्यशाळेवेळी खालील बाबी सर्वानुमते निश्चित करण्यात आल्या.

1. शैक्षणिक वर्ष २०२० – २०२१ मध्ये सुधारित करण्यात आलेल्या बी.ए. भाग २, एम.ए, १ व २ हिंदी विषयाच्या अभ्यासक्रमामधील खालील पेपरचे स्वयं अध्ययन साहित्य नव्याने करण्याचे निश्चित करण्यात आले

| | |
|---|---|
| १ | बी.ए. भाग २ पेपर ३ आधुनिक हिंदी गद्य साहित्य - I पेपर ५ आधुनिक हिंदी गद्य साहित्य - II |
| २ | बी.ए. भाग २ पेपर ४ मध्यकालीन एवं आधुनिक हिंदी काव्य पेपर ६ आधुनिक हिंदी काव्य |
| ३ | एम. ए. भाग १ सत्र १ व २ आधुनिक गद्य साहित्य |
| ४ | एम. ए. भाग १ सत्र १ व २ भाषाविज्ञान एवं हिंदी भाषा |
| ५ | एम. ए. भाग १ सत्र १ पटकथा लेखन सत्र २ लघुपटनिर्माण |
| ६ | एम. ए. भाग १ सत्र १ विशेष रचनाकार भगवानदास मोरवाल ~~लेखन~~ सत्र २ विशेष रचनाकार कमलेश्वर |
| ७ | एम. ए. भाग १ अनुसंधान प्रविधि और प्रक्रिया |
| ८ | एम. ए. भाग २ सत्र ३ व ४ आधुनिक हिंदी काव्य |
| ९ | एम. ए. भाग २ सत्र ३ व ४ भारतीय साहित्य |

2. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडून यापुर्वीच्या अभ्यासक्रमाप्रमाणे तयार करण्यात आलेले खालील स्वयंअध्ययन साहित्याची शैक्षणिक वर्ष २०२३ – २०२४ मध्ये सुधारित झालेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे पुर्नरचना करण्यात यावी असे निश्चित करण्यात आले याकरिता संपादकांची नियुक्ती करण्यात आली. तसेच आवश्यक त्या घटकलेखनासाठी लेखक नियुक्त करण्यात आले.

| | |
|---|---|
| १ | एम. ए. भाग १ सत्र १ व २ हिंदी साहित्य का इतिहास |
| २ | एम. ए. भाग २ सत्र ३ व ४ साहित्य शास्त्र (सदर पेपरसाठी यापुर्वीच्या अभ्यासक्रमाप्रमाणे तयार करण्यात आलेले भारतीय काव्यशास्त्र तथा पाश्चात्य काव्यशास्त्र या स्वयंअध्ययन साहित्याची पुनर्रचना करावी. ) |
| ३ | एम. ए. भाग २ सत्र ३ व ४ प्रयोजनमूलक हिंदी |

3. कार्यशाळेवेळी नियुक्त सर्व लेखकांनी आपले घटक लेखन दि. ३०/०८/२०२३ पुर्वी दूर शिक्षण केंद्राकडे जमा करावे

कार्यशाळेच्या शेवटी श्री पी. एस. कांबळे यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यशाळा समाप्त झाल्याचे घोषित केले.

(श्री पी. एस. कांबळे)
हंगामी सहाय्यक प्राध्यापक हिंदी

(डॉ नितीन रणदिवे)
हंगामी सहाय्यक प्राध्यापक बी.ए.

प्रो. (डॉ.) एस. एस. सावंत
अध्यक्ष, हिंदी अभ्यासमंडळ
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
CENTRE FOR DISTANCE AND ONLINE EDUCATION
PHONE : 0231– 2609105, Extension No. 202, 204
www.unishivaji.ac.in, Email : cde_sim@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४, महाराष्ट्र
दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
दूरध्वनी क्रमांक : ०२३१ -२६०९१०५, विस्तारित क्रमांक: २०२, २०४
www.unishivaji.ac.in, ई-मेल : cde_sim@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

Ref.No : SU/CDOE/
संदर्भ : शिवाजी वि./सीडीओई/1431

Date / दिनांक : 07 AUG 2023

प्रति,

| | |
|---|---|
| प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख,<br>अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | प्रो. (डॉ.) साताप्पा सावंत,<br>अध्यक्ष, हिंदी अभ्यासमंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर<br>विलिंग्डन कॉलेज सांगली, जि. सांगली ४१६ ४१५ |
| प्रो. (डॉ.) एस. बी. बनसोडे,<br>जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर | प्रो. (डॉ.) एन. आय. शेख,<br>श्री. विजयसिह यादव कॉलेज, पेठवडगाव |
| प्रो. (डॉ.) पी. एस. लाड,<br>भोगावती महाविद्यालय, कुरुकर्ली | प्रो. (डॉ.) बी. बी. अगेडकर,<br>किसनवीर महाविद्यालय, वाई, |
| डॉ. प्रकाश आठवले,<br>कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण इस्लामपूर, | डॉ. अशोक मरळे,<br>कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण इस्लामपूर |
| प्रो. (डॉ.) अशोक बाचुळकर,<br>आजरा महाविद्यालय, आजरा | डॉ. भास्कर भवर,<br>कर्मवीर हिरे आर्टस, कॉमर्स, सायन्स अ‍ॅन्ड एज्युकेशन कॉलेज गारगोटी |
| डॉ. गजानन भोसले,<br>सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा | डॉ. सरोज बिडकर,<br>डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज |
| डॉ. गजानन चव्हाण,<br>श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर | डॉ. एस. पी. चिंदगे,<br>देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस अ‍ॅन्ड सायन्स कॉलेज, यशवंतनगर चिखली |
| डॉ. प्रवीणकुमार चौगुले,<br>श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज ऑफ आर्टस अ‍ॅन्ड सायन्स सांगली | प्रो. (डॉ.) नितीन धवडे,<br>मुधोजी कॉलेज फलटण |
| डॉ. नरसिंग एकिले,<br>शिवराज कॉलेज ऑफ आर्टस अ‍ॅन्ड कॉमर्स गडहिंग्लज | डॉ. सुधाकर इंडी,<br>नाईट कॉलेज ऑफ आर्टस अ‍ॅन्ड कॉमर्स, इचलकरंजी |
| डॉ हेमलता काटे,<br>बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण | प्रो. (डॉ.) सिंद्राम खोत,<br>प्रा. (डॉ. ) एन. डी. पाटील महाविद्यालय, मलकापूर |
| डॉ. संतोष माने,<br>शिवराज कॉलेज ऑफ आर्टस अ‍ॅन्ड कॉमर्स गडहिंग्लज | प्रा सुपर्णा संसुद्धी<br>जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर |
| प्रो. (डॉ.) उत्तम थोरात<br>आदर्श कॉलेज, विटा | प्रो. (डॉ.) बळवंत जेऊरकर,<br>विलिंग्डन कॉलेज सांगली, जि. सांगली ४१६ ४१५ |
| डॉ सविता निबांळकर,<br>मुधोजी कॉलेज, फलटण | डॉ. आर. पी. भोसले,<br>कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय पुसेगाव |
| प्रो. (डॉ.) रमेशकुमार गवळी,<br>कृष्णा महाविद्यालय, रेठरे बुद्रूक | डॉ निलेश दामसे,<br>डॉ. मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लमापूर |
| डॉ. संग्राम शिंदे,<br>आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय मेंढा | डॉ. वर्षाराणी निवृत्तीराव सहदेव,<br>श्री. विजयसिंह यादव महाविद्यालय, पेठवडगाव |
| डॉ. मनिषा बाळासाहेब जाधव,<br>आर्टस अ‍ॅन्ड कॉमर्स कॉलेज, शुक्रवार पेठ, सातारा | डॉ. बी. बी. राठोड,<br>श्री शहाजीराजे महाविद्यालय, खटाव |
| डॉ. सुनंदा सोपनराव मोहिते,<br>सरदार बाळासाहेब माने महाविद्यालय रहिमतपूर | श्री. सर्जेराव यशवंत भोसले,<br>राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औधं |
| डॉ परशराम रामजी रगडे,<br>शंकरराव जगताप आर्टस अ‍ॅन्ड कॉमर्स कॉलेज, वाघोली | डॉ. विठ्ठल शंकर नाईक,<br>श्रीमती ए. आर. पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी |
| डॉ हणमंत महादेव सोहनी,<br>सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगुड | डॉ माधव मुंडकर,<br>नाईट कॉलेज ऑफ आर्टस अ‍ॅन्ड कॉमर्स, इचलकरंजी |
| श्री अविनाश वसंतराव पाटील,<br>न्यू कॉलेज, शिवाजी पेठ, कोल्हापूर | |

विषय : बी.ए. भाग २, एम.ए. भाग १ व २ हिंदी विषयाच्या स्वयं अध्ययन साहित्यासंदर्भात आयोजित कार्यशाळेबाबत.

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३ – २०२४ मध्ये सुधारित करण्यात आलेल्या बी.ए. भाग २, एम.ए. भाग १ व २ हिंदी विषयाच्या अभ्यासक्रमाप्रमाणे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडे प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता स्वयंअध्ययन साहित्य तयार करावयाचे आहे. याबाबत दि. १०/०८/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सदर कार्यशाळेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती

कळावे,

आपला विश्वासू

VShinde

सहाय्यक कुलसचिव